नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.


सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र



युगवाणी

ना. रा. बामणगावकर

द. चिं. सोमण

अशोक विजय राहा

योगेश्वर अभ्यंकर

बाबा मोहोड

तुळशीराम काजे

निशिकांत करकरे

दत्तात्रेय कुळकर्णी

मधु वाबगांवकर

म. ना. सरपटवार

वसंत पेंढरकर

अ. ना. लोथे

अ. ना. देशपांडे

केशव केळकर

विश्वास र. कानडे

शिवाय

संघवार्ता वगैरे

डिसेंबर १९५३

किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक–पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

वर्ष ८ वें] डिसेंबर १९५३ [अंक ९ वा

अनुक्रमणिका

हें मासिक श्री. पां. ना. बनहट्टी यांनी नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर येथे मुद्रित केलें व श्री. ना. रा. शेंडे, सरचिटणीस वि. सा. संघ, यांनी संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर येथे प्रकाशित केलें.

युगवाणी

वर्ष ८ वें डिसेंबर १९५३ अंक ९ वा

संपादकीय

खामगावचें येतें विदर्भ साहित्यसंमेलन

विदर्भ साहित्य संघाचें सोळावें अधिवेशन डिसेंबर २५, २६, २७ या तारखांना खामगाव येथे भरणार आहे या गोष्टीची संघाच्या सभासदांना आठवण करून द्यायला नकोच. कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या गावीं हा साहित्यसोहळा भरणार आहे यांत एक विशेष औचित्य आहे. विदर्भांत प्रांतीय साहित्यसंमेलनें भरवावींत या कल्पनेचे ते एक प्रमुख पुरस्कर्ते होते. गेल्या अर्ध तपांत विदर्भ साहित्य संमेलनें वाढत्या जोमाने भरत आहेत. हे साहित्यिक व सांस्कृतिक सोहळे केवळ स्थानिक दृष्टीनेच उपयोगी नाहीत तर सबंध प्रांतांत सांस्कृतिक उत्थान घडवून आणण्याचें कार्य त्यांच्या द्वारें घडत असतें. यंदाचें संमेलन आपल्या प्रांतांतील प्रसिद्ध कवि प्रा. भवानीशंकर श्री. पंडित यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून त्यावेळीं मराठीप्रेमी जनता व साहित्यिक जास्तींत जास्त संख्येने उपस्थित राहतील अशी आम्हाला खात्री आहे.

*

श्री. पंडित बाबुरावजी पराडकर

आधुनिक हिंदी वृत्तव्यवसायाचे जनक श्री. बाबुराव पराडकर यांचा ७१वा वाढदिवस त्यांच्या उपस्थितींत विदर्भ साहित्य संघाने नुकताच साजरा केला ही बातमी सर्वांना परिचित आहेच. 'वंगवासी' या कलकत्त्याच्या वृत्तपत्रांत त्यांनी आपल्या वृत्तपत्रीय जीवनाला आरंभ केला आणि 'हितवार्ता' आणि 'भारतमित्र' या वृत्तपत्रांचेंहि संपादन केलें. पण त्यांची मुख्य कामगिरी म्हणजे हिंदींतील मुख्य दैनिक 'आज'चें संपादन. 'आज' साठी त्यांनी भोगलेल्या हालअपेष्टा, देशकार्यात घडलेला तुरुंगवास आणि इतर कौटुंबिक व आर्थिक अडचणी इत्यादींचा इतिहास त्यांच्या कर्तव्यनिष्ठेची साक्ष देतो. त्यांच्या संयत, सुगम आणि संस्कारक्षम शैलीनेच हिंदी वृत्तपत्रांना आजचें प्रौढ स्थान प्राप्त करून दिलें आहे. 'आज'च्या फायलींत दडून बसलेल्या त्यांच्या अग्रलेखांचें ग्रंथरूपाने प्रकाशन झाल्यास हिंदी आणि इतर भाषी जगाला त्यांच्या कार्याचें चिरस्थायी स्वरूप अधिक स्पष्ट रीतीने कळून येईल. बाबुरावजींचा जो मान-सन्मान होत आहे तो तर उचित आहेच पण त्यांच्या असंख्य चाहत्यांनी या ग्रंथप्रकाशनकार्याकडे लक्ष द्यावयास हवें. हिंदी वृत्तकला जगविण्यांतील आणि वाढविण्यांतील त्यांच्यासारख्या मराठीभाषी लेखकाची ही हिंदी कामगिरी पाहून मराठी जनतेला अभिमान वाटणें साहजिक आहे. आम्ही त्यांना दीर्घायु आणि आरोग्य चिंतितों.

*

विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दप्तरी

आपणा सर्वांना पूज्य व अत्यंत प्रिय असलेले भाऊजी दप्तरी यांना दिनांक २२-११-५३ रोजीं ७४ वें वर्ष लागलें ही गोष्ट अत्यंत आनंदाची व सुखाची आहे. गणित व ज्योतिर्विद्या यांतील अपूर्व नैपुण्य, धर्मग्रंथांच्या सखोल अभ्यासांतील दिसणारी मूलगामी बुद्धीची प्रखरता, करणलता ग्रंथांतील त्यांच्या कल्पकतेची चमक, त्यांचें अगाध संशोधनपाटुत्व इत्यादि त्यांच्या गुणांची साक्ष जनतेला अगोदर पटलेलीच आहे. धर्मरहस्य, जैमिन्यर्थदीपिका, महाभारत युद्धकालनिर्णय

इत्यादि अपूर्व ग्रंथांनी भाऊजींना भारतीय कीर्तीच्या पदवीचा मान आधी अर्पण केला आहेच. तथापि भाऊजींच्या संबंधी जो विशेष आपलेपणा वाटतो त्याचें कारण आहे. त्यांनी आपली विद्वत्ता जनतेच्या हितासाठी वाहविली आहे. त्यांची अष्टपैलू बुद्धि जुन्या ग्रंथाच्या अगदी गाभ्यांत जशी शिरते, तशीच ती वर्तमानकालीन सामाजिक व धार्मिक अशा अत्यंत कठीण प्रश्नांचाहि अंतर्भेद करूं शकते, इतकी तीं पुरोगामी आहे. यासाठी भारतीय समाजजीवनाच्या सध्याच्या नाजूक व क्रांतिकारक परिस्थितींत, भाऊजींसारख्या निरहंकार, प्रेमळ, स्थितप्रज्ञ व जनकल्याणाची तळमळ असणाऱ्या थोर व्यक्ति समाजाला मार्गदर्शक असणें अत्यंत जरूर आहे. म्हणून त्यांचा वाढदिवस म्हणजे समाजाच्या जीवनाचा वाढदिवस असें असल्यानें कोणालाहि आनंद वाटेल. परमेश्वरानें त्यांना उदंड आयुष्य द्यावे हीच आमची प्रार्थना.

*

नभोवाणी व कै. केळकर

तात्यासाहेब केळकरांची पुण्यतिथि मागल्या महिन्यांत होती हें सर्वश्रुतच आहे. या प्रसंगानें नभोवाणीचें जें धोरण दिसलें त्यासंबंधी लिहिणें प्राप्त आहे. पुणें नभोवाणी केंद्रानें तात्यासाहेबांच्या पुण्यस्मृतीची दखल घ्यायची नाही असें ठरवलें होतें. त्यांच्या चाहत्यांनी नभोवाणी केंद्रावर कार्यक्रम व्हावा म्हणून प्रयत्न करूनहि ता. १८ आक्टोबरला कार्यक्रम तर काय, पण नुसती वातमी देखील देण्यांत आली नाही. पण मागाहून सुबुद्धि होऊन तात्यासाहेबांच्या पुण्यतिथीला श्री. दा. वि. गोखल्याचें भाषण करून झालेल्या चुकीचें परिमार्जन केलें गेलें. नभोवाणी खात्याच्या कित्येक गंमती असतात त्यांतलीच ही एक. निघन गेला तर हत्ती जातो, नाही तर त्याच्या शेपटीचें टोकहि अडकून राहतें. स्थानिक केंद्राचे अधिकारी कित्येकदा याला जबाबदार नसतातहि. तर कित्येकदा स्थानिक केंद्राधिकारी सामान्य धोरणाचा अर्थ इतका काटेकोरपणें लावतात की, त्यांची वागणूक कुणालाहि विक्षिप्त वाटावी.

हा प्रकार तात्यासाहेब केळकरांच्या बाबतींत झाला हें एका दृष्टीनें फार चांगलें झालें, इतर कुणाच्या बाबतींत झाला असता तर त्या वादाला फाटे फोडतां आले असते; परंतु तात्यासाहेबांविषयी वाद घालायला कुणालाहि कारण नाही. तात्यासाहेबांचें मराठी साहित्यांतील स्थान अनन्य आहे. पन्नासहूनहि जास्त वर्षेंपर्यंत अविरत साहित्यसेवा करीत राहूनहि त्यांची लेखणी कधीं कुठेहि शिणलेली आढळली नाहीं. लेखणीला विषय मिळाला की तात्यासाहेबांना तो उचललाच. साहित्यिक होण्याकरिता त्यांना सतत व्यासंग असल्यामुळे, अनेक लेखकांना काय लिहावें हा अनेकदा प्रश्न पडतो तो, त्यांना कधीच पडला नाही आणि जो जो साहित्यप्रकार त्यांना आढळला तो तो त्यांनी हाताळला. त्यामुळेच त्यांच्या हातून विपुल साहित्य निर्माण झालें. केसरींतील आणि इतरत्रचें त्यांचें निबंधात्मक लिखाण मराठी भाषेचें चिरंतन लेणें झालें. मराठेशाहीचें शतसांवत्सरिक श्राद्ध म्हणून लिहिलेला 'मराठे आणि इंग्रज' हा ग्रंथ ऐतिहासिक विषयावर असूनहि त्याला साहित्यिक स्वरूप देऊन विषय किती मनोवेधक होऊं शकतो याची साक्ष पटवून दिली. लो. टिळकांचें त्रिखंडात्मक चरित्र तात्यासाहेबांच्या परिश्रमाचें मूर्तिमान स्वरूप आहे. 'तोतयाचें बंड' आणि 'कृष्णार्जुन युद्ध' हीं नाटकें त्याचप्रमाणे त्यांचें कथा-कादंबरी साहित्य, त्यांची कविता हें सगळें साहित्य म्हणजे त्यांच्या ठिकाणच्या लालित्याचा भरघोस विलास होय.

तात्यासाहेबांच्या साहित्यामागे ज्याप्रमाणे साहित्यिक प्रेरणा होती, त्याचप्रमाणे राष्ट्रकार्याचीहि होती. ज्या विचारप्रणालीचा राष्ट्रांत उदो उदो होतो आहे तिचीच तळी उचलून धरणें हाच कालांतरानें राष्ट्रकार्याचा अर्थ झाल्यामुळे प्रामाणिक मतभेद ज्याचा असेल त्याच्याकडे उपेक्षेनें पाहण्याची प्रवृत्ति बोकाळली. तात्यासाहेबांच्या बाबतींतहि हाच प्रकार झाला. त्याचबरोबर त्यांचें साहित्यहि उपेक्षणीय असें कांही मानूं लागले. ही प्रवृत्ति अत्यंत हीन आहे आणि आता ही मनोवृत्ति ठेवणें कृतघ्नपणाचें आहे. तात्यासाहेब हें मराठी साहित्याला लाभलेलें वरदान आहे. म्हणूनच त्यांचें पुण्यस्मरण जागवणें आवश्यक आहे. इतर संस्था तर हें कार्य करतीलच; पण पुणें नभोवाणी केंद्रानें तें कर्तव्यबुद्धीनें पार पाडणें आवश्यक आहे. नभोवाणीनें पुण्यतिथि व जयंती यांच्या संबंधीचें आपलें धोरण अधिक तारतम्यानें व समजूतदारपणानें अमलांत आणावें अशी सप्रेम सूचना आहे.

*

कै० दादासाहेब खापर्डे यांची काव्यशास्त्रविनोद दृष्टि

ना. रा. बामणगावकर, अमरावती

कै. लोकमान्य टिळकांत वक्तृत्व नसलें तरी विचारांची तर्कशुद्ध प्रखरता व विषय मांडण्यांत सुगमता हीं प्रामुख्यानें होती. त्यांचेबरोबर त्यांची देशभक्ति सर्व तऱ्हेनें कसोटीला उतरली असल्यामुळें लोकांत त्यांना एका प्रभावी विशिष्ट अधिकाराचें स्थान प्राप्त झालें होतें. त्यामुळें टिळक ज्या सभेंत असत त्या सभेंतील लोकांचीं हृदयें सहजपणें त्यांच्याच भोंवती फिरत असत. अशा सभेंत टिळक बोलले असतां किंवा टिळक बोलण्यापूर्वी आपलें बोलणें लोकांना ऐकायला लावणें मोठें कठीण: परंतु कै. दादासाहेब खापर्डे हे असे वक्ते होते की, टिळकांच्या सभेंत टिळक बोलण्यापूर्वी वा नंतरहि आपलें म्हणणें श्रोत्यांना ऐकवीत. श्रोतेहि मोठ्या हर्षभरानें व प्रफुल्लित मनानें डुलडुलत तें ऐकत. त्यांच्या वक्तृत्वांत विनोद तर होताच पण विनोदाइतकेंच गांभीर्यहि असे. विषयाचें विश्लेषण अत्यंत मार्मिक दृष्टांतांनी केलेलें असे. नटांना अभिनय शिकवितांनासुद्धा त्या शास्त्रांतील व त्या भूमिकेंतील सूक्ष्मांत सूक्ष्म प्रकाराचें रहस्यहि ते अत्यंत सुस्पष्ट रीतीनें समजून सांगत. एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध व विसाव्याचा पूर्वार्ध यांत भारतांत जे नामवंत वक्ते झाले त्यांत कै. दादासाहेबांना एक विशिष्ट स्थान त्यांच्या संस्कृत व इंग्रजी भाषानैपुण्यामुळें प्राप्त झालें होतें. मराठी भाषेंतील वक्तृत्वांत जी प्रगति झाली तिचें मूळहि दादासाहेब खापर्डे यांचें रसाळ वक्तृत्वच आहे. कै. शिवरामपंत परांजपे यांची छद्मी भाषाशैली वाखाणण्यासारखी असली तरी दादासाहेबांच्या भाषणांत ते गुण होतेच. कै. ल. रा. पांगारकर व धुळ्याचे दासभक्त श्री. शंकरराव देव यांच्यांतील भक्तिरसाचा जिव्हाळा हाहि दादासाहेबांत होता. कै. अच्युतराव कोल्हटकरांच्या भाषणांतील कलाकृता व कावेबाजपणा हाहि दादासाहेबांत होता. कै. तात्यासाहेब केळकर यांची रंगत ही तर दादासाहेबांना अभिजात देणगी होती. ते कोठेंही बसोत, तें बोलूं लागले कीं, सर्व आबालवृद्ध ऐकत असत व डोलत असत. आणि त्यांच्या पाठांतरशक्तीचें व कथासंग्रहाचें कौतुक करीत. इंग्रजींत जर बोलूं लागले तर सर्वच इंग्रजी थाट रहात असे व त्यांतून आपले सिद्धांत ते समजून सांगत. मराठी बोलूं लागले तर संस्कृत व मराठी थाट राहत असे: गुजरथींत बोलूं लागले तर गुर्जर साहित्यकांच्या आधारें गुर्जर साहित्यकांसहि ते लाजवीत. कै. दादासाहेबांनी फारसें लिहिलें नाही: ग्रंथलेखन केलेंच नाही. फक्त सभापांडित्य हें त्यांचें बाळकडू. त्या काळांत वक्तृत्वाला वाव देणारें वृत्तपत्रपांडित्य हें पुढे आलें नव्हतें. मराठींत तरी आजहि विशेष पुढे आलें आहे असें म्हणतां येत नाही. परंतु वक्ता, लेखक व पत्रकार जेथें एक [illegible] तेथें वक्तृत्वांतील पाल्हाळ प्रसिद्ध [illegible] आणि वाचतों व पाहतों.

दादासाहेबांचें व्यक्तिमत्त्व [illegible] वैशिष्ट्यपूर्णच असे. आणि त्यांत एक [illegible] आकर्षकता होती. ते मुंबईला कॉलेजमध्ये शिकत असतां

रोजनिशी लिहित होते. त्या रोजनिशींत असा उल्लेख सांपडतो की, त्यांच्या क्लबने "वेणीसंहार" नाटक बसवायला घेतलें होतें व त्यांत भीमाची भूमिका दादासाहेबांकडे आली होती. शरीर सदृढ व्यायामाचें. घोड्यावर बसण्याचा नाद. भीमाची क्रोधवश मुद्रा कशी असावी, व आवाजांत भीषणता कशी उत्पन्न व्हावी याकरिता त्यांनी श्रमपूर्वक अभ्यास केला होता. आणि साभिनय मुद्रा करून भीमाची भीमगर्जना त्यांनी केली की, दुसरे विद्यार्थी घाबरत. दुःशासन व दुर्योधनाची भूमिका करणारे विद्यार्थि तर हा भीम खरोखरच आपल्या नरडीचें रक्त पिणार की काय असें वाटून घाबरून जे गैरहजर झाले ते झालेच ! त्यामुळे तें नाटकच झालें नाही. त्यांनी या विद्यार्थिदशेंत 'दामाजीपंत' नाटक लिहिलें होतें असाहि उल्लेख सांपडतो. पण त्या रोजनिशा संपूर्ण नाहीत व जी आहे ती अर्धवट व फाटलेली आहे. पण त्यांत त्यांच्या साहित्यभक्तीची चुणूक आहे. तथापि पुढे दादासाहेब खापर्डे यांचा साहित्याचा वा लालित्याचा व्यासंग इतका दांडगा झाला व त्यांचा लौकिक महाराष्ट्रभर एवढा पसरला की, कै. शिवरामपंत परांजपे यांच्या "रामदेवराव" नाटकास प्रस्तावना दादासाहेबांची असून कै. खाडिलकर यांचें रंगभूमीवर आलेलें पहिलें नाटक "कांचनगडची मोहना" हें दादासाहेबांना अर्पण केलेलें आहे आणि पहिल्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा मानहि त्यांना मिळाला. लोकमान्यांबरोबर राजकारणांत जर दादासाहेबांनी उडी घेतली नसती किंवा टिळकांचे स्नेही म्हणून जर त्यांना वारा लागला नसता तर महाराष्ट्र साहित्य परिषदेचें अध्यक्षपद तरी त्यांना केव्हाच लाभलें असतें. १९१३ मध्ये कै. हरिभाऊ आपटे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र साहित्य परिषद आकोला येथे झाली त्यावेळीं त्यांना तेथे बोलण्यास वाव मिळाला. तेव्हा परिषदेचे अध्यक्ष आपटे आणि कै. प्रा. भानू वगैरेंनी दादासाहेबांच्या ह्या भाषणाबद्दल मोठी वाहवा केली. अशा प्रकारें दादासाहेबांच्या काव्य, लालित्य वगैरेंतील पारंगतत्व पाहून कोणी त्यांची प्रसंशा केलीच तर "पुष्पांच्या संबंधें सूत्रालाहि घडे शिरीं वास" असें म्हणून नागपुरांतील विद्वानांची परंपरा त्यांच्या मुखांतून निघत असे. ती अशी—सदाशिवशास्त्री घुले हे काशी क्षेत्रांत वैय्याकरणकेसरी झाले. सर्व पंडितांनी त्यांना पालखींत बसवून काशीक्षेत्रांत मिरविलें. त्या घुल्यांना भोसल्यांनी नागपुरास आणून संस्कृत विद्यापीठ चालविण्यास सहाय्य केलें. विख्यात सदाशिवभट्ट घुले हे त्यांचे वंशज. या सदाशिवभट्टाचे शिष्य रंगाचार्य व कृष्णशास्त्री. त्यांचे शिष्य महामहोपाध्याय कृष्णशास्त्री घाटे आणि नारायणशास्त्री पिंजरकर होत. आणि त्यांचा मी शिष्य अशी परंपरा ते सांगत. "कै. नारायणशास्त्री पिंजरकरजवळ माझ्या वडिलांनी मला अभ्यास करावयास ठेवलें. रूपावली, समासचक्र, पंचकाव्यांचा अभ्यास वगैरे आणि सिद्धान्तकौमुदी त्यांच्या जवळच मी शिकलों. पुढे मुंबईला कॉलेजांत कै. रामशास्त्री बोडस, आणि वैकुंठवासी भीष्माचार्य झळकीकर या विद्वानांचा सहवास मला घडला." यावरून ते म्हणत की "**संसारविषवृक्षस्य द्वे एव रसवत्फले । काव्यामृतरसास्वादः संगमः सुजनैः सह**" मला वाटतें नागपूरला जें विदर्भ साहित्य संमेलन दादासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली भरलें होतें त्या वेळीं आरंभींच्या भाषणांत हें सर्व निवेदन त्यांनी केलें आहे.

याच भाषणांत त्यांनी असा एक सिद्धान्त पुढे केला की, "साहित्य, व्याकरण, मीमांसा आणि वेदान्त याखेरीज पाश्चात्यांचें पाऊल सर्व शास्त्रांत पुढे आहे. परंतु वरील शास्त्रें आपल्या पूर्वजांनी इतकीं उंच नेलीं आहेत की, पाश्चात्य अद्याप जमिनीवरच रांगत आहेत असें म्हणावें लागतें. न्याय, व्याकरण, मीमांसा व वेदान्त हीं शास्त्रें फार कठीण व तीं गुरूशिवाय समजत नाहीत. साहित्यशास्त्र मात्र सुगम व अति आनंद दायक. इतकेंच नव्हे तर अंतीं मोक्षाला नेणारें असें त्यांचें मत त्यांनी सांगितलें आहे. "चतुर्वर्गफलप्राप्तिः सुखादल्पधियामपि ।। काव्यादेव यतस्तेन तत्स्वरूपं निरूप्यते" हा साहित्यदर्पणांतील श्लोक सांगून "अखंडं सच्चिदानंदं परं ब्रह्मैव लक्ष्यते" असें म्हणून काव्यांत ईशभक्तीला स्थान कसें मिळालें ? परब्रम्हाची लक्षणा कशी कळते इत्यादि विवेचन करून काव्य शास्त्राची महती त्यांनी गाइली आहे. म्हणूनच संतवाङ्मयाचें परिशीलन करणारे लेखक त्यांच्याकडे नेहमी येत व त्यांच्याशीं चर्चा करीत. मराठींत संतवाङ्मयास महत्वाचें स्थान दादासाहेबांनी दिलें आहे.

पण काव्यानंद त्यांतच आहे. इतर अंगांत नाहीच असें म्हणून इतर रसांना त्यांनी गौण मानलें नाही. "वैदर्भी रीति" ही त्यांना फार पसंत आहे. कोठेहि कोणत्याहि वेळीं त्यांना बोलावयास सांगितलें तर वामनसूत्रांतील "रीतिरात्मा काव्यस्य। विशिष्ठ पदरचना रीतिः। सा त्रिधा। वैदर्भी गौडी पांचाली च समग्रगुणा वैदर्भी" असें म्हणून "अस्पृष्टा दोषमात्राभिः समग्रगुणगुंफिता विपंचिस्वरसौभाग्या वैदर्भी रीतिरुच्यते" हा दाखला देऊन त्याचीं अनेक उदाहरणेंहि देत. पुणें येथील टिळक विद्यालयांत एकदा वैदर्भीय विद्यार्थ्यांनें दादासाहेबांना कै. केळकरांच्या अध्यक्षतेखाली भाषण करण्यास विनविलें असतां वैदर्भी रीतीचें विवेचन करणारे अनेक श्लोकचे श्लोक दादासाहेबांनी म्हणून दाखविले व त्यांचें हृदयंगम विवेचन केलें होतें. तरी हें विवेचन शाखाचंद्रन्यायाचें होतें असें ते म्हणत. ग्रंथ समोर वा बगलेंत न ठेवतां अथवा टिपणेंहि समोर न ठेवतां "सहृदयहृदयानां रंजकः कोऽपि पाकः" असा त्यांच्या अमोघ वक्तृत्वाचा डौल असे. साहित्यशास्त्राचा वा लालित्याचा संस्कृतभाषेइतका इतर पाश्चात्य भाषांत विचारच अद्याप झाला नाही असें त्यांचें मत आहे.

कोणत्याहि भाषेला उन्नत व्हावयाचें असल्यास वा उच्च पदवीला ती चढावयाची असल्यास ती व्याकरण बद्ध पाहिजे. संस्कृत भाषेला अष्टाध्यायींत महर्षि पाणिनीने बांधून टाकलें. अशी व्यवस्था कोणत्याहि भाषेची नाही ही गोष्ट पाश्चात्य पंडितांनीसुद्धा कबूल केली आहे. संस्कृतांत साहित्याच्या अनेक अंगाउपांगांचे बाबींवर पूर्ण व सन्मानीय असे ग्रंथ असून प्राचीन व अर्वाचीन भाषांत तसे नाहीत. उपमारूपक इत्यादि अनेक बाबींचे ठळक अलंकार Rhetoric सदराखाली आढळतात. परंतु सर्व अलंकारांचा परामर्श घेऊन विवेचन करणारा प्रबंध आणि रस व त्याचे भेद दाखविणारे ग्रंथ संस्कृतमध्ये जितके आहेत तितके इंग्रजींत नाहीत. साहित्यशास्त्र हें नैय्यायिकांना फार पसंत. पण इंग्रजीतील 'तर्कशास्त्र' (लॉजिक) व आपलें न्यायशास्त्र यांत फार मोठा फरक. तर्कशास्त्र हे तीन अवयवांचें वाक्य मानतें तर न्यायशास्त्र हें पांच अवयवांचें वाक्य मानतें. तर्कशास्त्रांत हेत्वाभास फार; पण न्यायशास्त्रांत हेत्वाभास नाहीत. नैय्यायिकांनी साहित्यशास्त्राला मान्यता देऊन साहित्यिक व्हावयास अर्थात् 'भट्ट' ही पदवी संपादन करावयास कांही नियम सांगितले आहेत. वेदान्तशास्त्रांत पारंगतता मिळविणारास प्रस्थानत्रयी करावी लागते तद्वतच 'भट्ट' ही पदवी मिळविण्याकरिता 'गदाधरी' इत्यादि ग्रंथ शिकून त्यावर एक प्रबंध लिहावा लागतो. अशा प्रकारचे विचार साहित्यिकांच्या चर्चेच्यावेळीं दादासाहेब खापर्डे साकार पुढे करीत. विदर्भ साहित्य संघांतील अध्यक्ष ह्या नात्याने त्यांचें भाषण उपलब्ध झालें व त्यावर कोणी जर एखादा प्रबंध लिहिला तर तो अत्यंत अभ्यसनीय होण्याचा संभव आहे. तात्पर्य काय की, दादासाहेबांच्या साहित्यविषयक ज्ञानावर, लालित्य व विनोद यावर संस्कृत साहित्यिकांचीच छाया विशेष पडली होती. १९०८ ते १९१० पर्यंत दादासाहेब इंग्लंडला असतांना अनेक नटांशीं व नटशाळांशीं त्यांचा परिचय झाला. आरशांत पाहून अभिनय शिकण्याच्या प्रवृत्तीला ते अनैसर्गिक म्हणत. डोळयांतून भाव जसे सहज उमटत असतात तसे आरशाकडे दृष्टि लावल्याने डोळयांतून भाव प्रगट व्हावयास अडचळा येतो. हीहि गोष्ट ते स्पष्ट करीत होते. 'गटे' सारखा महाकवि 'शाकुंतल' वाचतो व समजून घेतो तेव्हा तो लागलीच उद्गारतो की; पृथ्वी व स्वर्ग कोठे असेल तर तो शाकुंतलांत आहे.

साहित्यकांचे वा साहित्यशास्त्राचे निंदक आजहि आहेत व पूर्वीहि होते. पण त्यांच्याविषयी दशरूपकाराच्या शब्दांत दादासाहेब उत्तर देत असत तें असेः—

> "आनंदनिस्यन्दिषु रूपकेषु । व्युत्पत्तिमात्रं फलमल्पबुद्धिः ॥ योपीतिहारादिवदाह साधुः । तस्मै नमः स्वादुपराङ्मुखाय"

याप्रमाणे त्यांच्या भाषणांत संस्कृतनिष्ठ कोटिक्रम, कथा, उपमा, अलंकार वगैरे विशेष प्रमाणांत असत. लोकमान्य टिळक, खापर्डे व विठ्ठलभाई यांना अजमीर येथे लोकांनी मानपत्रें दिलीं तेव्हा ते म्हणाले की; देवपूजेला आपण बसलों म्हणजे प्रथम शंख व घंटा यांची पूजा करीत असतों. गंधाक्षता प्रथम त्यास वाहतो. तसाच हा प्रकार दिसतो. आता या देवापुढील (लोकमान्यांपुढील) शंख कोण व घंटा कोण यांचा निर्णय मी व विठ्ठलभाई यांनी करावयाचा आहे. दादासाहेबांच्या या भाषणाने टिळक, विठ्ठलभाई व

सर्व सभा गदगदा हसली तर नवल कांहीच नाही. प्रसंगाला उचित असा विनोद त्यांच्या मुखांतून निघत असे. म्हणून आबालवृद्धादि स्त्रीपुरुषांपुढे दादासाहेब भाषण करावयास उभे राहिले कीं, गहनसिद्धांतहि सहज सुगमतेने ते पटवून देत. "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या" असा विषयहि ते रंगवीत असत. रंगदेवता त्यांना प्रसन्न असे पण ती संस्कृतनिष्ठ साहित्यिकांच्या पांडित्याची निदर्शक असे. सुक्षमता व सहजता हे या रंगदेवतेचे अलंकार असत. फाजील नटणें, वाह्कळ शब्द उच्चारणे, ओढून ताणून हसविणें हे त्या रंगदेवतेस मान्य नव्हते.

काव्यानंद म्हणजे काय; किंवा याची व्याख्या काय, अथवा याकरिता थोडक्यांत 'योग्य शब्द कोणता' याकरिता शब्दपंडितांत शब्दांचें रण माजलेलें दिसतें. कोणी म्हणतो 'सविकल्प समाधि', नुसती सविकल्प चालत नसेल तर 'स्वायत्त सविकल्प समाधि' म्हटलेलें चालेल. दुसरा म्हणतो अहो, यांत 'समाधि शब्दाला' जलसमाधीच दिली पाहिजे. एक विद्वान असा निघाला कीं, समाधीच म्हणावयाचें असेल तर सविकल्प म्हणणें चुकीचें असून 'सास्मित समाधि' म्हणणेंच योग्य, पक्षपात बुद्धीने नव्हे; पण सास्मित समधींत स्वीकार्य वाटणारी उपपत्ति सिद्ध व्हावी हाच कित्येकांना हव्यास; हा हव्यास पाहून कित्येकांना वाटतें की, स्वायत्त तादात्म्यताच चांगली. हे सर्व शब्द आहेत हें खरें. पण त्यांतून निश्चित अर्थ निघतो कां ? कां ब्रह्मघोटाळा आहे ? काव्यानंदांतील आनंद हा शब्द घेतला तर आनंद हा एक प्रसंगनिष्ठ भाव आहे. वास्तविक आनंद हें आकाशाप्रमाणे अफाटहि आहे व घटाकाशाप्रमाणे तें मर्यादित आहे. त्याची मर्यादा व अमर्यादा शब्दाने बांधणें वा व्यक्त करणें हें कठीण; कठीण नसतें तर ब्रह्मापुढे शब्द थकला ही वेदांत्यांनी कबूली दिली नसती. आणि ब्रह्मानंद अशा पंडितांचें रंजन करावयास समर्थ नाही, अशी संस्कृत भाषेंतील म्हण प्रचारांत आलीहि नसती. कै. दादासाहेब खापर्डे यांच्यापुढे वा त्यांच्या गुरुजनांपुढे हा वाद गेला असता तर या वादांत "रंजन" काय आलें तें प्रथम मला सांगा असें विचारलें असतें. आणि ज्यांत रंजन नाही, त्यांत साहित्य नाही; आणि ज्यांत साहित्य नाही, त्याने साहित्यांतील आनंद कसा व्यक्त होणार, असा दुसरा प्रश्न टाकला असता; तद्वतच "गदाधरी" ग्रंथ अभ्यासा; त्यावर प्रबंध लिहा; 'भट्ट' ही पदवी मिळवा व मग साहित्यिक म्हणून चर्चा करण्यास तयार व्हा असेंच नसतें कां म्हटलें ?

पहिली भरारी

अनुवादक—द. चिं. सोमण

तो छोटा समुद्रपक्षी त्या कपारींत एकटाच होता. त्या कपारीच्या आंतल्या बाजूला एक साधारण मोठेसें भगदाड होतें. त्या भगदाडांतच त्याचें घरटेंहि होतें. त्याने नव्हतें तें बांधलें, तें बांधलें होतें त्याच्या आई-बापानें ! तो जन्मला नव्हता तेव्हा.

त्या घरट्यांत नंतर त्याचा जन्म झाला. तो, त्याचे दोघे भाऊ व एक बहीण अशीं चौघेहि एकाच दिवशीं आपापलीं अंडीं फोडून बाहेरच्या जगांत आलेलीं होतीं.

पण आता कुणीच नव्हतें तिथे, त्या कपारींत ! एकटा तोचकाय तो होता ! त्याचे आईबाप, भाऊ आणि बहीण हीं सर्वच त्याला तिथे एकटा टाकून आदल्या दिवशींच उडून डाव्या बाजूकडच्या त्या डोंगऱ्यांतल्या दुसऱ्या एका कपारींत जाऊन राहिलीं होतीं. त्याला तीं स्पष्ट दिसत; ओरडणेंहि स्पष्ट ऐकूं येई !

त्याचीं तीं तीन भावंडें उडून गेलीं तेव्हा त्यांच्याबरोबर भरारी मारण्याची त्याला हिंमतच झाली नाही. जवळ जवळ एकाच वेळीं तीं सगळींजणें अंडीं फोडून बाहेर पडलीं ना ? मग ! पण नव्हतें त्याला तेवढें धैर्य; एवढेंच !

आदल्या दिवशीं तीं तिघें उडून गेल्यावर तोहि सारें धैर्य एकवटून कपारीच्या शेवटापर्यंत गेला, त्याने पंख पसरले, थोडी फडफड केली; परंतु मग कपारीचा पायांखालचा आधार सोडून देऊन आपला चिमुकला

देह हवेवर झोकून द्यायचें धैर्य त्याला झालें नाही. भीतीने थरथर कापत धावतच तो परत कपारीच्या आंतल्या भागांत घुसला व घरट्याआड दडून त्याने डोळे गच्च मिटून घेतले. जणू त्याला कुणी उचलून बाहेर फेकूनच देणार होतें !

कपारीखाली अफाट अथांग निळागडद समुद्र पसरलेला होता. त्याची कपार असलेला तो डोंगर तरी लहान कां होता ? किती उंच ! किती तरी उंच ! आणि तो समुद्र व ती कपार यांच्यांतलें अंतर बघवतच नव्हतें ! आपले लहान पंख आपला लहान देह तोलून धरायला असमर्थ ठरतील आणि आपण एकदम खाली खोल खोल पडून समुद्रांत बुडूं व मरून जाऊं असाच दचका त्याच्या मनाने घेतला होता. त्याचे भाऊ आणि ती बहीण कशी धीटपणें उडून गेली व तो ! तो अजून कपारींतच होता ! उडून गेलेलीं तीं तिथें पुन्हा पुन्हा परत येऊन त्याला कपारीच्या टोकापर्यंत नेत व त्याच्याकडे बघत पंख पसरून अंग झोकून देत ! एक भरारी मारून तीं लगेच परत यायचीं ! तो नुसता त्यांच्याकडे बघत राही व तीं गेलीं की मान खूप खाली वाकवून आणि आपल्या लहान पायांवर चटकन् एक गिरकी घेऊन धावत घरट्याआड जाऊन लपे ! त्याची आई आणि बाप दोघेंहि कर्कश आवाजांत त्याला हाका मारीत कपारींत घुसत, त्याला समजावून सांगत, धाक दाखवीत, उपाशी मरण्याचें भय घालीत. पण छे ! त्याने पंख पसरले की त्याचे पाय मुळी लटपटायला लागत व तो केविलवाणा होई !

आणि आता गेला संपूर्ण दिवस कुणीच आलें नव्हतें त्याच्याकडे ! त्याचे भाऊबहीण त्याला भरारी मारायला शिकवून जणू कंटाळलीं व शेवटीं त्याच्यावर रागावून, त्याला कायमचा सोडून चालतीं झालीं ! त्याची आई तरी वास्तविक त्याला कांही खायला आणून द्यायची; तथापि तिलासुद्धा त्याचा जणू विसरच पडला. आदल्या दिवशीं सूर्य उगवल्यापासून अगदी मावळेपर्यंत त्याचे आईबाप व त्यांचीं तीं तीन लाडकीं मुलें समुद्रावर सतत भरारत होतीं. त्याच्या भावंडांचे आईबाप त्यांच्या लाडक्या मुलांना उडायला मनापासून शिकवीत होते. उसळणाऱ्या घुसळणाऱ्या लाटांना स्पर्श करीत अचूक एखादा-मासा कसा टिपायचा हें त्याचा एक भाऊ तर लगेच शिकला. त्याच्या दुसऱ्या भावानेहि काल दुपारच्या सुमारास चटकन् झेप घालून एक मासा उचलला व आईबापाने केवढें कौतुक मांडलें त्याचें ! हो, ती आई, तो बाप हीं दोघें त्या तिघांचींच होतीं ! तीं पांचहि एकमेकांचीं होतीं ! त्याचें कुणीच नव्हतें त्या पांच जणांत ! तो बिचारा एकटा कपारींत उभा होता. त्यांच्यापैकी कुणी त्याचें असतें तर त्याची चौकशी करायला नसतें का आलें त्याच्यापर्यंत ! आणि त्या वेगळ्या कपारींत कशाला रहायला गेलीं तीं पांचहि; तीं त्याचीं नव्हतीं म्हणूनच ना ? तीं वेगळीं, त्यांची कपार वेगळी ! तीं सारखीं त्यांच्या कपारींत जात, बसत, ओरडत व पुन्हा भराऱ्या मारायला लागत !

त्याला सगळें दिसे, ऐकूंसुद्धा येई !

सगळीकडे ऊबदार लालसोनेरी ऊन पसरलें होतें. उन्हाची ऊब त्याच्या कपारींतहि घुसली होती. परंतु तेवढीहि ऊब त्याला सहन होत नव्हती ! भुकेने कळवळला होता तो ! अत्यंत वैतागून, संतापून, निराश होऊन आपले लांब पाय दूर दूर टाकीत कपारींतल्या कपारींत कितीतरी फेऱ्या त्याने घातल्या !

पहाट फुटण्याच्या सुमारास त्याला एक युक्ति सुचली. घाईघाईने तो कपारीच्या कडेला गेला व समुद्रपक्षी झोपतांना उभे राहतात तसा मुद्दामच तो उभा राहिला. एकाच पायावर उभा राहून दुसरा पाय दुमडून त्याने पंखाखाली घातला होता व चोच पंखांत खुपसली होती ! झोप लागल्याचा बहाणा करीत होता तो ! झोपेंत आपला तोल जाऊन आपण खाली पडूं या भयाने आईबापांपैकी कुणीतरी घाईने आपल्याला जागें करायला येईल अशी त्याची कल्पना होती. डोळे गच्च मिटून त्याने बराच वेळ वाट पाहिली. तथापि कुणीच त्याची दखल घेतली नाही. त्याने पुन्हा डोळे उघडले. समोरच्या कपारींत तीं पांचजणें होतींच ! त्याचीं भावंडें पंखांत चोची खुपसून अजून उभ्या उभ्या झोपलेलींच होतीं. बाप आपल्या पांढऱ्या पाठीवरचीं पिसें साफ करीत होता आणि त्याची आई कपारींतल्याच एका उंच दगडावर बसून पायाशीं पडलेल्या एका मोठ्या माशाचें मांस चोचीने सोडवून काढीत होती. मधून मधून ती चोच दगडावर मागेपुढे घासत असे व

तसें करतांना त्याच्याकडे तिचें लक्ष नक्की जात होतें ! पण तरीहि तिला तो जणू दिसतच नव्हता !

त्या माशाकडे पाहूत त्याची भूक हद्दीबाहेर गेली. भुकेने वेडावल्यासारखा झाला तो ! कण्हल्याप्रमाणे त्याने एक चीत्कार केला ! तो चीत्कार ऐकून त्याची आई त्याच्याकडे पाहून त्याला हाका मारूं लागली ! त्याच्याकडे येत मात्र नव्हती ती !

जीव एकवटून त्याने आईला हाक मारली. त्याला तो मासा हवा होता. आईने प्रत्युत्तरादाखल मारलेली हांकहि त्याने ऐकली आणि मग कळवळून तो सतत आरोळ्या ठोकायला लागला.

आणि नंतर मात्र त्याने आनंदाने थयथयाट सुरू केला; कारण माशाचा एक तुकडा चोचींत धरून त्याची आई त्याच्याकडे येतांना त्याला दिसली. उत्सुकतेने तो खूप पुढे वाकला. कपारीच्या अगदी टोकाशीं आपण आहोंत हें विसरला होता तो ! तेवढ्यांत त्याची आई आलीसुद्धा ! तथापि तो जरा चकित झाला; कारण आई सरळ कपारींत शिरली नाही. तुकडा तोंडांत धरून कपारीच्या बाहेरून पंख तोलून धरीत ती त्याच्यापुढे स्थिर झाली ! त्याची चोच व माशाचा तुकडा यांत अगदी थोडें अंतर होतें आता ! आणि तो भुकेने व्याकुळ झाला होता ! त्याने चोच पुढे करीत एकदम त्या तुकड्यावर झडप घातली ! भुकेमुळे सारें विसरला होता तो ! त्याने झडप घातली मात्र आणि आई एकदम तुकडा घेऊन वर उडून गेली ! एक कर्कश केविलवाणी किंकाळी फोडून तो खाली कोसळला. भयाने अर्धमेला होत तो खाली समुद्रांत पडत होता. त्याचें हृदय धडधडायचेंच जणू थांबलें व तो गुदमरल्यासारखा झाला. दुसरी किंकाळी फोडायचें भानसुद्धा त्याला उरलें नाही. कानठळ्या बसल्या त्याच्या !

परंतु नंतर लगेच आपण नकळत आपले पंख पसरले आहेत हें त्याच्या लक्षांत आलें. खालून वर येणारा समुद्रावरचा वारा त्याच्या पोटाखाली सापडे व पंखांना आधार देई. नकळत पंख हलवायला लागला तो आणि पंखांचीं टोकें हवा कापूं लागलीं. समुद्राचा घों घो असा आवाज त्याच्या कानांत घूमूं लागला. तो पडत होता, पण अगदी सावकाश पडत होता. त्याला वाटलें होतें तसा कोसळत नव्हता तो !

त्याने पंख हलवले व तो वर येऊं लागला ! त्याची भीति क्षणांत पार नाहीशी झाली. त्याचें डोकें जरा जड झालें होतें व जोरजोराने पंख हलवून तो वर वर येत होता. आनंदाने विस्मयाने ओरडत तो डोंगराच्या शिखराकडे चोच पुढे करून येऊं लागला.

त्याची आई केव्हाच त्याच्याजवळ येऊन त्याच्या आसपास उडत होती. तिच्या पंखाचा आवाज त्याला मजेदार वाटला. त्याचा बापहि एकदम कपार सोडून आला व त्याचें कौतुक करीत त्याला धीर देऊं लागला. त्याचे ते दोन भाऊ व ती बहीणहि आली व त्याला उत्तेजन देत त्याच्या भोवतीं निरनिराळ्या प्रकारांनी उडूं लागलीं. तीं तिथे सूर मारून एकदम लाटांपर्यंत जात व लगेच परत त्याच्याकडे येऊन ओरडत !

तोहि त्यांचें अनुकरण करूं लागला. कांहीच कठीण नव्हतें तसें उडणें ! त्याला सहज यायला लागलें तें ! उगाचच घाबरत होता तो !

सूर मारून तो लाटांपर्यंत गेला. त्याने पाण्यावर पाय ठेवून उभें राहण्याचा प्रयत्न केला. व एकदम त्याचे पाय पाण्यांत गेले. पाण्यावर तसें उभें कसें राहतां येणार ? तो बुडत होता ? पुन्हा एकदा भीतीने त्याला कापरें भरलें ! तथापि तेवढ्यांतच त्याचें पोट पाण्याला लागलें व तो बुडण्याऐवजीं सहज आपोआपच पाण्यावर तरंगायला लागला ! निष्कारण भ्याला होता तो ! पण असें तरंगतां येतें हें त्याला कुठे ठाऊक होतें ! तें ठाऊक असतें तर मुळीच घाबरला नसता तो ! तसा धीट होता तो !

त्याचे आईबाप व भावंडें पाण्यावर उतरून त्याच्या भोवतीं लाटांवर तरंगूं लागलीं. त्याला शाबासकी देत होतीं तीं ! त्याच्या बहिणीने माशाचा एक तुकडा प्रेमाने त्याच्या पुढे केला !

तीं सारींच त्याचीं होतीं ! खूप मजा वाटत होती त्याला !

तो त्यांच्यांतला त्यांचाच होता आणि त्याने पहिली भरारी मारली होती !

अंहं ! भित्रा नव्हता तो. नव्हताच ! छे !

[Liam O' Flaherty यांची His First Flight ही कथा]

अनुक्रमणिका

कांही कविता

प्रादेशिक गीत

हें काव्य आम्हाला उपलब्ध करून दिल्याबद्दल शांतिनिकेतनच्या सौ. लीला रे आणि श्री. प्रभाकर माचवे यांचे आम्ही आभारी आहोंत.

मूळ बंगाली

शीत रात

ग्राम-बूडी कांथामूडी खोडेर धुंआय
नाक डेके घारगूंजे बेजाय घुमाय
पथघाट घूमे काठ, कोथा नेइ साड़ा,
एक पाये घूम जाय गाछपाला खाड़ा,

झोपेझापे लियालेरा सब-चूपचाप
शिशिरेर फोटागुलि झडे टूपटाप
इंदुरेर बादुरेर नेई खूटखाट
एकधरे सुए आछे धानकाटा माठ !

बट–गाछे केंदे उठे शकुनेर छा
जेगे उठे पाखमाट मारे तार मा
एकाएका कुवासाय एइ शीत राते
कानाचांद भाङ्ा एक लानटन हाथे
आदमपुरेर दिके चलियाछे पा

मूळ कवि—अशोक विजय राहा

(मराठी गद्यांत अनुवाद)

हिवाळ्यांची रात्र

गावांतली म्हातारी गोवडी पांघरून गवताच्या धुरांत
नाक झांकून
मान दुमडून
घोरत पडली आहे.
रस्ता लाकडाप्रमाणे निपचित पडला आहे.
कुठेंहि नाव नाही
एका पायावर उभ्या उभ्या झाडं झोपलीं आहेत
झुडुपांत कोल्हे चूपचाप आहेत
उंदिरांची खुटखूट नाही की
वटवाघळांची फडफड नाही.
दवबिंदू वाळून राहिले आहेत.
कापणी झालेलीं धानाचीं शेतं एका कडेला झोपलीं आहेत.
वडाच्या झाडावर गिधाडाचं पिल्लूं ओरडतं,
त्याची आई जागून उठते आणि त्याला पंखाची
थापड मारते.
हिवाळ्याच्या रात्रीं एकाएकीं कानाचांद* आपल्या
ओंगळवाण्या वस्तींतून उठून,
फुटका कंदिल हातीं धरून
आदमपूरच्या दिशेने पावलं टाकीत आहे.

*चंद्रकोर, व्यक्तीचें नांव.

अनुक्रमणिका

जीवन लहरी

—१—

दुःखरूपी तापानें
व्यथित हें, हृदय इथें
संकटांत गोंधळुनी
घाबरलें हृदय इथें
दुःखाच्या रात्रीला
वंचनेंत तें रडतें
मूर्तिपाशीं अंका
शंकित होवुन बसतें !

—२—

शेवटचें एक गीत
गाईन मी जळतांना
शेवटचें चरण तिथें
मृत्तिकेंत मिळतांना
"हासलात उपहासें
माझी गरिबी बघुनी
देहाची माती या
तुडवा अतुल्या चरणीं"

—योगेश्वर अभ्यंकर

शाप

दोप्रहरींच्या जळत्या उन्हांत
फोडती खडी जे लोखंडी छिन्नीनें
पत्थर भिजवुनिया घामानें
सडकेच्या काठाशीं
अन् राहतात उपाशी
विवस्त्र, दुर्बळ, असह्य स्थितींत
त्या श्रम-जीवींच्या साठी
आणाया अढळ तक्त भूवरती
समृद्धीचें, समतेचें, शांतीचें
एका क्षणांत
एका दमांत
कां न स्फुरती भुजा अमुच्या
नवतरुणांच्या ?
-आश्चर्य आहे ! -आश्चर्य आहे !

विवस्त्र पाठीवरती
वाहुनिया नांगराचा फाळ
पिकविती धान्याची रास
जे महात्मे
पहा दशा तयांची
बायकापोरांना पडती उपास
पडक्या खोपटांत त्यांच्या अन्
नसतो दिवा
नसतो विसावा
अंधार...भूक...विव्हळणें
यांचेंच साम्राज्य त्यांच्या घरांत
धिक्कार असो पुरुषार्थास अमुच्या
जोंवर हें बघतों अम्ही
उघड्या डोळ्यानें !

कष्टतात जे
घुराड्यांत गिरणीच्या
करूनिया रक्ताचें पाणी
निर्मितात वस्त्राच्या राशी
तलम, रेशमी
हा—हाय परंतु
उघडीच पाठ तयांची
जाड्याहि वस्त्राविण
अन् घरधनिणीची लाज
झाकावी कशानें ही विवंचना
रडविते त्या निर्मात्याला
अशी ही उघडी स्थिति
नष्टविणार आहांत केव्हा ?
तुमच्या सामर्थ्यानें ?

जोवरती ही
नष्टणार ना भयाण-स्थिति
तोवर धिक्कार असो
अमुच्या तोतया पुरुषार्थास
दिखाऊ अकंपेस !

—बाबा मोहोड

अनुक्रमणिका

सांज

उष्ण वायुच्या झुळकीसरसी
नाजुक संध्या म्लान जाहली
निळ्या सावळ्या क्षितिजकिनारीं
काजळ छाया तरळुं लागली

थकले काळिज श्रमुन तरीही
घार निरखते आकाश–घरा
मुठींत बांधुन जीव आपुला
खार शोधते जरा निवारा !

गाभाऱ्यांतिल मूक व्यथेने
पिंपळपानें पडलीं काळीं
हिरमुसलेली मंदि बिचारी
बसली ठेउन हात कपाळीं

वटवृक्ष उभा निःस्तब्ध पथीं
घाव झाकुनी खोल उरींचा
बाभळिच्या मनि सलतो काटा
गतकाळांतिल आठवणींचा

भरें कांपरें दीप शरीरीं
तमांत बुजली वाट पाहुनी
क्षणांत चरकुन तरल काजवा
झेप घेतसे केविलवाणी !

रातराणिचा सुगंध पिउनी
काळी नागिण डुलकी घेते
आकाशामधि सांजतारका
मेघाआडुन मंद हासते

—तुळशीराम काजे

थरक जीवांत (कणिका)

दुर्वास असो कुणी–कुणि असो जमदग्नी
वर्षवो मजवरी ज्वालामुखिचा अग्नी,

सुटणार न मजला कम्प भयं स्वप्नींही
परि तडित् घेउनी व्योम प्रेमळ शान्त
कडकडेल मजवरि–म्हणूनि थरक जीवांत !

—निशिकांत करकरे

मध्यरात्रिचें काळिज कापत

मध्यरात्रिचें काळिज कापत
दुरून आले गीताचे स्वर
आर्त स्मृतींच्या झंकारांनी
नकळत अन् थरथरलें अंतर

हेंच गीत हो कधी एकदा
कुणीं गायिलें होतें रात्रीं
पुलक बहरले होते अगणित
आनंदाचे गात्रीं गात्रीं......

धुंद घरेच्या अंकावरती
सुप्त पहुडला होता कातळ
निरखित थरथरणाऱ्या तारा
निरखित नभनेत्रींचें काजळ

दूर जळांतिल खिरला होता
आर्त जोगिया सांजकाळचा
सरल्याविण अन् छेडत होती
रात बिलावल प्रथम प्रहरचा......

मध्यरात्रिचें काळिज कांपत
आर्त उमळले गीताचे स्वर
आर्त स्मृतींच्या झंकारांनी
थरथरलें अन् तुटलें अंतर !

—दत्तात्रेय कुळकर्णी

अनुक्रमणिका

तुझ्यामाझ्यांतलें नातें–

तुझ्यामाझ्यांतलें नातें
तुझ्यामाझ्यांत असूं दे
चार नयनांची मात
चारचौघांत नसूं दे ! १

तुझ्यामाझ्यांतलें नातें
बिसतंतूंच्या ह्या गांठी
सये प्रीतीच्या सरांत
दोन ओवलेलीं मोतीं २

तुझ्यामाझ्यांतलें नातें
स्वर्गजान्हवीचा स्त्रोत
संथ शांत त्यांत दोन
आत्महंस नाहतात ! ३

जाणतों मी अंतर्याम
तुझें माझें दोघांचेंहि
माझ्यारूपें लोचनांत
तुझ्या घनःश्याम राहो ! ४

व्याकुळावें मींच आणि
पाणावल्या पापणींत
तुझ्या निस्तुळ रूपाची
निहाळावी चांदणी ! ५

वाटूं दे ना एकदा ग
एकदाच थोडें तरी
प्राण पाखडाया सये
तिष्ठलों मी तुझ्या दारीं ६

तिष्ठलों मी तुझ्या दारीं !...

—मधु वाबगांवकर

तूंच थांबलिस चालुं लागतां—

तूंच बनवुनी भ्रमिष्ट वेडा
मला शिकविलें प्रेम कराया
मायामय जग अखिल सांगुनी
लाविलीस पण अपुली माया !

वृथा बोलणें तुझ्यामुळे अन्
मौनहि केवळ तुझेंच देणें
उणीव भासत ना कसलीही
वंचित जरि मी सर्वस्वानें !

जपुनि टाकिलें तव आधारें
प्रीतिपथावर पाउल पहिलें
तूंच थांबलिस चालुं लागतां
जीवन सरलें जीवन उरलें ! !

—म. ना. सरपटवार

काव्य––

—रुक्ष भासते पहाट
वाट पाहते कशास ?
तूं न आज मी उदास ॥धृ०॥

अविट प्रीत गोडवा
निर्मिला इथें तुवां
येउनी तूं केधवा
निर्मिला मनीं सुवास ॥१॥

हात हातीं घेउनी
नेत्र नेत्रीं रोखुनी
प्रेमरंगीं रंगुनी
खूळ लागलें जिवास ॥२॥

रुक्ष भासते पहाट
तिमिर लोचनांत दाट
व्हावी एक वेळ भेट
हाच एकलाच ध्यास ॥३॥

अनुक्रमणिका

कोलंबो योजनेचें समालोचन

लेखक—प्रा. अ. ना. लोथे

कोलंबो योजनेच्या विचार–विनिमय–समितीची (Consultative Committee) वैठक नवी दिल्ली येथे मागील महिन्यांत भरली होती. ह्या समितीच्या स्थापनेपासूनच हिन्दुस्थान ह्या समितीचा सभासद असून आतापर्यंतच्या प्रत्येक वैठकींत भारताने प्रामुख्याने भाग घेतला आहे. ह्या समितीच्या अधिवेशनाचें उद्घाटन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केलें. आपल्या भाषणांत ते म्हणालें, " आशियाखंड सध्या स्थित्यंतराच्या दर्शेतून जात आहे. शतकानुशतकें चालत आलेली राजकीय आणि आर्थिक गुलामगिरी झुगारून देऊन, प्रगतीच्या नव्या युगांत हा प्रदेश पदार्पण करीत आहे. आर्थिक उन्नति आणि सामाजिक समता ह्या दोन्ही गोष्टी साध्य करण्याची येथील लोकांची आत्यंतिक इच्छा आहे. ही आत्यंतिक इच्छा आणि या खंडांतील देशांच्या मूलभूत अडचणी लक्षांत घेऊन प्रगत राष्ट्रांनी ह्या प्रदेशांतील प्रश्नांकडे कल्पक दृष्टिकोनांतून पहावें." कोलंबो–योजनेच्या यशाचें मापन करण्यापूर्वी ह्या योजनेची थोडक्यांत रूपरेषा देणें आवश्यक आहे.

गेल्या महायुद्धानंतर अमेरिकेने पश्चिम युरोपला मार्शल-योजना, युरोप-सुधार-कार्यक्रम, इत्यादींच्या साहाय्याने वरीच मदत पुरविली. ब्रिटिश राष्ट्रकुटुंबांतील देशांनी आशियांतील मागासलेल्या ब्रिटिश राष्ट्रसंघीय देशांची आर्थिक स्थिति सुधारण्याकरिता एक एक नव्या स्वरूपाची योजना आखली. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य देशांतील उत्पादन–साधनसामुग्रीच्या आणि तांत्रिक ज्ञानाच्या सहयोगाने आशियांतील अविकसित आणि अर्धविकसित देशांची आर्थिक उन्नति करणाऱ्या योजनेची रूपरेषा प्रथम जानेवारी १९५० मध्यें कोलंबो येथे भरलेल्या ब्रिटिश राष्ट्रकुटुंबीय परराष्ट्र मंत्र्यांच्या वैठकींत आखण्यांत आली. ह्या योजनेलाच पुढे कोलंबो योजना हें नांव देण्यांत आलें. त्याच वैठकींत एक प्रातिनिधिक स्वरूपाची विचार-विनिमय समिति (Consultative Committee) स्थापन करण्यांत आली आणि तिची कालमर्यादा सहा वर्षांची असावी असें ठरलें. प्रथम ऑस्ट्रेलिया, सिलोन, भारत, पाकिस्तान, कॅनडा, न्यूझीलंड आणि मलाया, बोर्नियो ह्या वसाहतींसहित ग्रेटब्रिटन हीं सदस्य राष्ट्रें होतीं. त्यानंतर व्हिएटनाम, कांबोडिया, लाओस, ब्रम्हदेश आणि नेपाळ हे योजनेंत भाग घेणारे सदस्य देश झाले. ह्या योजनेंत जपानलाहि प्रवेश द्यावा अशी सूचना पुढे आली आहे. कोलंबो योजनेंत समाविष्ट केलेल्या प्रदेशांतील देशांचा आर्थिक अभ्युदय करण्याकरिता शक्यतोंवर तद्देशीय साधनसामग्रीवर अवलंबून राहून आणि जरूर पडल्यास ब्रिटिश राष्ट्रकुलाबाहेरील देशाची देखील मदत घेऊन योजनेची अंमलबजावणी करण्यांत येत आहे. भाग घेणाऱ्या देशांतील परस्पर सहकार्यावरच जास्त जोर दिला जातो. आशिया खंडांतील राष्ट्रांपुढे उभे असलेले आर्थिक प्रश्न सोडविण्याकरितां त्या त्या देशांनी आपल्या परीने प्रयत्न केला पाहिजे आणि इतर पुढारलेल्या देशांनी जमेल तें सहकार्य देऊन ह्या विस्तृत प्रदेशाची सर्वांगीण उन्नति करण्यास मदत केली पाहिजे. हेंच कोलंबो योजनेचें मुख्य उद्दिष्ट आहे. दक्षिण आणि आग्नेय आशियांतील देशांच्या आर्थिक

अवनतीचें मुख्य कारण उत्पादकतेचा ऱ्हास हे आहे. औद्योगीकरण आणि तांत्रिक सुधारणा हे त्यावरचे प्रमुख उपाय होत. हे देश कृषि-प्रधान असल्यामुळे शेतीमध्ये आमूलाग्र सुधारणा व्हावयास पाहिजे. त्याकरिता कालवे, पाटबंधारे, दळणवळण आणि वाहतुकीचे मार्ग, जलविद्युत इत्यादि सुधारणांचे कार्यक्रम कोलंबो योजनेंत समाविष्ट केले आहेत. सुरवातीला योजनेकरिता आवश्यक असणाऱ्या खर्चाचा अंदाज १८६८ दशलक्ष पौंड करण्यांत आला होता. योजनेच्या पहिल्या वर्षात युनायटेड स्टेटने योजनेंत भाग घेणाऱ्या देशांना जवळ जवळ १५ कोटि डॉलर्स पुरविले. ह्याशिवाय अमेरिकेनें ह्या प्रदेशाला २८ कोटि डॉलर्सचें कर्ज देखील दिलें. ह्या परकीय मदतीचा उपयोग. हिन्दुस्थानला सर्वांत जास्त झाला. दीर्घ मुदतीच्या बऱ्याच योजना कार्यान्वित करण्याकरिता पैशाच्या रूपांतील आणि तांत्रिक स्वरूपाची मदत भारताला प्रगत राष्ट्रांनी दिली आहे. गेल्या दोन अडीच वर्षांत युनायटेड स्टेटस्कडून आणि आंतरराष्ट्रीय बँकेकडून हिंदुस्थानला जवळ जवळ १८९ कोटि रुपयांपर्यंत मदत मिळाली आहे. तुंगभद्रा योजना आणि हैद्राबादमधील रामगुंडन योजना पार पाडण्याकरिता ऑस्ट्रेलियाने दिलेली साडे सहा कोटि रुपयांचेवरील मदत उपयोगांत आणली गेली आहे. पश्चिम बंगालमधील मयूराक्षी भूसेचन योजना अमलांत आणण्याकरिता कॅनडाने दिलेली जवळ जवळ ७ कोटि रुपयांची मदत उपयोगांत यावयाची आहे. न्यूझीलंडने उपलब्ध केलेली मदत निरनिराळ्या आरोग्यविषयक सुधारणा अमलांत आणण्याकरिता उपयोगांत आणली जात आहे. ग्रेट-ब्रिटनने स्टर्लिंग गंगाजळींतून मोकळे केलेले पैसे निरनिराळ्या धरण-योजना, मध्यवर्ति ट्रॅक्टर संस्था, इत्यादींवर खर्च करण्यांत आलेले आहेत.

आर्थिक पुनर्रचनेची कोणतीहि योजना अंमलांत आणण्याकरिता शास्त्रज्ञांची आणि तंत्रविशारदांची फार आवश्यकता असते. कोलंबो-योजनेंत भाग घेणाऱ्या आशियांतील देशांजवळ अशा प्रकारच्या आवश्यक तांत्रिक ज्ञानाचा फार मोठ्या प्रमाणांत अभाव आहे. ह्या दृष्टीनेच ह्या योजनेच्या अन्तर्गत 'तांत्रिक सहकार्य समिति' (Council for Technical Corporation) स्थापन करण्यांत आली. ह्या समितीची मुख्य कचेरी कोलंबो येथे आहे. कोलंबो योजनेचा सभासद ह्या नात्याने भारताने देखील दुसऱ्या देशांना मदत पुरविली आहे. आणि तांत्रिक मदतीच्या बाबतींत हिंदुस्थानला बऱ्याच परदेशीय तंत्रज्ञांचें साहाय्य मिळत आहे. ह्याशिवाय इतर देशांत तांत्रिक शिक्षणाच्या सवलती पण मिळाल्या आहेत. तांत्रिक सहकार्य योजनेंकरिता भारताने जवळजवळ १ कोटि रुपये दिले असून योजनेच्या विभागांतील विद्यार्थ्यांना देशांतील निरनिराळ्या संस्थांत तांत्रिक शिक्षण घेण्याकरिता आतापर्यंत ७५ शिष्यवृत्त्या दिल्या आहेत. इन्डियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट, कलकत्ता, इन्स्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजी, कानपूर, कस्टमस् कलेक्टोरेट, मुंबई, इत्यादि संस्थांत परदेशीय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत.

वरील विवेचनावरून हें स्पष्ट होतें की ह्या प्रदेशांतील स्वतंत्र राष्ट्रांमध्ये परस्पर सहकार्य दृढ करण्याकरिता कोलंबो-योजना बरीच कारणीभूत झालेली आहे. ह्या योजनेंत भाग घेणाऱ्या राष्ट्रांच्या-स्वतःच्या योजनांचा अन्तर्भाव करण्यांत आला असून योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्या त्या राष्ट्रावरच आहे. परकीय मदत ज्या ठिकाणीं अतिशय आवश्यक असेल त्या ठिकाणीं आवश्यक ती मदत गरजू राष्ट्रांना इतर देशांकडून पुरविण्यांत येते.

कोलंबो योजनेकरिता सादर केलेल्या सहा वर्षांच्या आर्थिक सुधार कार्यक्रमांतूनच भारताची पहिली पंचवार्षिक योजना जन्मास आली. नियोजन समितीने पंचवार्षिक योजनेला जेव्हा निश्चित आणि मूर्त स्वरूप दिलें, तेव्हा कोलंबो योजनेंत अन्तर्भूत केलेल्या षष्ठ वार्षिक कार्यक्रमांतही फेरबदल करावे लागले. भारताची पहिली पंचवार्षिक योजना आणि कोलंबो योजना ह्या दोन्हीहि आता तिसऱ्या वर्षांत पाऊल टाकीत आहेत. कोलंबो योजनेच्या विचार-विनिमय समितीच्या अधिवेशनांत भाग घेण्याकरिता आलेले ब्रिटिश शिष्टमंडळाचे पुढारी श्री. रेजिनॉल्ड मॉडलिंग ह्यांनी हिन्दुस्थानला ५० लक्ष पौंडांचें कर्ज देऊं केलें. ह्या कर्जाचा उपयोग दामोदर खोरें योजना आणि दुसरा पोलादाचा कारखाना यांवर व्हावा अशी

(पुढील मजकूर पान २० वर)

ग्रंथ समालोचन

मराठी कादंबरी

(लेखिका : सौ. कुसुमावती देशपांडे; प्रकाशक मुंबई मराठी साहित्य संघ; किंमत साडेतीन रुपये)

प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांनी निरनिराळ्या नियतकालिकांतून विशेषतः 'मौजें'तून आणि 'अभिरुचीं'-तून टीकात्मक आणि समालोचनात्मक स्वरूपाचे स्फुट लेख लिहून एक मार्मिक व महनीय वाङ्मयचिकित्सक म्हणून जो लौकिक मिळविलेला आहे त्यांत, त्यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'मराठी कादंबरी' या ग्रंथानें निस्संशय फार मोठी भर घातलेली आहे. स्फुट टीका-त्मक लेख लिहिण्याचा चांगलाच सराव झाल्यानंतर आता समालोचनात्मक–ग्रंथलेखनाच्या नव्या कर्तृत्व-क्षेत्रांत त्यांनी पदार्पण केलेलें आहे. स्फुट टीकालेख लिहिणें आणि टीकात्मक ग्रंथ लिहिणें या दोन गोष्टी निराळ्या आहेत; त्यांतून प्रकट होणाऱ्या लेखनशक्तींत केवळ प्रमाणाचाच भेद नसून प्रकारभेद आहे. ज्यांना स्फुट टीकालेख लिहिणें साधतें त्यांना टीकाग्रंथनिर्मिती साधेलच असें म्हणतां येत नाही. त्या दृष्टीनें आतापर्यंत मातवर स्फुट समीक्षाकार म्हणून मान्यता मिळविलेल्या कुसुमावतींच्या या पहिल्या ग्रंथनिर्मितीचें 'न्यायकरुण' मूल्यमापन होणें आवश्यक झालेलें आहे.

मराठी कादंबरीचा तब्बल शंभर वर्षांचा इतिहास म्हटला म्हणजे वाचकांच्या डोळ्यासमोर एक भरदार आणि जाडजूड ग्रंथ उभा राहतो. पण कुसुमावतींच्या ग्रंथाचें बारकें स्वरूप पाहिल्यानंतर मात्र मन कांहीसें उदास होतें. आणि 'प्रथमग्रासे'च थोडासा अपेक्षाभंग होतो. प्रकाशित ग्रंथ हा समग्र ग्रंथाचा पहिला भाग आहे हें कळल्यानंतर या उदासीनतेची तीव्रता कमी होते. मराठी कादंबरीच्या उगमापासून आरंभ करून तिच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि तात्त्विक प्रकारांचें पोषण आणि संवर्धन कोणीं व कसें केलें यासंबंधीचें साधार विवेचन या ग्रंथांत करण्यांत आलें आहे. पहिल्या भागांत हरि नारायण आपटे, वामन मल्हार जोशी, डॉ. केतकर आणि भा. वि. वरेरकर या प्रमुख कादंबरी-कारांच्या कर्तृत्वाचा विशेष विस्तारानें परिचय करून दिलेला आहे. हरिभाऊंच्या कृतींचें गुणग्रहण करतांना कुसुमावतींनी जी डोळस रसिकता दाखविलेली आहे ती निस्संशय अभिनंदनीय आहे. त्यांच्या रसिकतेचें हें डोळस स्वरूप वामन मल्हारांच्या त्यांनी केलेल्या न्याय्य परीक्षणांत उत्तम रीतीने प्रतीत होतें. वा. ल. कुळ-कर्ण्यांनी वामन मल्हारांच्या कादंबरी लेखनकर्तृत्वा-भोवती जें अलौकिक तेजोवलय निर्माण केलेलें आहे तें बाजूला सारून वास्तविक योग्यता काय आहे हें कुसुमावतींनी निस्संदिग्धपणें पटवून दिलें आहे. तसेंच डॉ. केतकरांच्या प्रश्ननिष्ठ कादंबऱ्यांचें यथार्थ महत्त्व-मापन करण्यांत त्यांची मर्मग्राही रसिकता व्यक्त झालेली आहे. नाथमाधव, हडप, नारायण हरि आपटे इत्यादि दुय्यम दर्जाच्या कादंबरीकारांच्या सामर्थ्याच्या मर्यादाहि त्यांनी स्पष्टपणें दाखवून दिल्या आहेत. कादंबरीकारांच्या व्यक्तिगत मूल्यमापनाबरोबरच, आरंभापासून आता-पर्यंत मराठीच्या कादंबरीच्या तंत्रांत आणि आशयांत कसकसा बदल होत गेला, तो बदल तसा कां झाला, यासंबंधीचें विवेचन करणें आवश्यक होतें. कदाचित असें विवेचन पुढील भागांत असेलहि. पुढील भागावर वाचकांची दृष्टि ताटकळत न ठेवतां, आरंभापासून आतापर्यंतच्या कालाचे तीन महत्त्वाचे कालखंड पाडून, प्रत्येक कालखंडांत मराठी कादंबरीला कसें स्वरूप प्राप्त झालें, असें जर दाखविलें असतें तर तें वाचकांच्या अभ्यासाच्या दृष्टीनें सोयीचें होऊन, इतिहासलेखनाच्या दृष्टीनें तसें लिहिणें अधिक शास्त्रीय

झालें असतें. १८१८ पासून १८७४ पर्यंतचा म्हणजे इंग्रजांची सत्ता महाराष्ट्रांत प्रस्थापित झाल्यापासून १८७४ सालीं निबंधमालेच्या रूपानें स्वाभिमानी राष्ट्रवादाचा उदय होईपर्यंतचा पहिला कालखंड, १८७४ ते १९२० पर्यंतचा चिपळूणकर, टिळक व आगरकर यांच्या प्रभावाचा आणि एकंदरीनें आधुनिक मराठी वाङ्मयाच्या बहराचा दुसरा कालखंड आणि १९२० पासून आजतागायतचा सामान्यांच्या, साधारणांच्या प्रभावाचा तिसरा कालखंड असे आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे तीन कालखंड पडतात. याच तीन कालखंडांच्या अनुषंगानें मराठी कादंबरीचा इतिहास लिहिणें आवश्यक होतें. वाचकांना मराठी कादंबरीच्या इतिहासाचा शंभर वर्षांचा घास एकदम न देतां उपरोक्त तीन कालखंडांचे तीन आटोपशीर घास दिले असते तर विवेचनांत शास्त्रीयता येऊन, वाचकांना मराठी कादंबरीच्या विकासाचें यथोचित दर्शन घडलें असतें. इतिहासांत व्यक्तीइतकेंच कालखंडालाहि महत्त्व असतें. विशिष्ट कालखंडांत विशिष्ट तत्त्व कार्यक्षम झालेलें आढळून येतें. या कालमाहात्म्याची, कालतत्त्वाच्या या प्रभावाची कुसुमावतींनी, घ्यावयास पाहिजे तितकी दखल घेतली असती तर हरिभाऊ आपटे, वामन मल्हार जोशी आणि भा. वि. वरेरकर यांच्या कादंबऱ्यांचें एकाच भागांत विवेचन आलें नसतें. तशी दखल घेतली असती तर सध्या आहे तसा हा ग्रंथ मध्येच कोठेंतरी तोडण्यांत आला नसता. स्फुट टीकालेखांत असें एखादे वेळीं चालेल पण सलग ग्रंथांत तें मोठें वैगुण्य ठरतें.

परीक्ष्य ग्रंथाची प्रस्तावना आणि 'कादंबरीचा उगम' हें पहिलें प्रकरण–हीं विशेष महत्त्वाचीं आहेत, कारण त्यांत त्यांनी कांही विवाद्य प्रश्नांचा परामर्ष घेतलेला असून कांही विवाद्य विधानेंहि केलीं आहेत. उदाहरणार्थ, प्रस्तावनेंत त्यांनी कलानिष्ठेचें अधिष्ठान, तादात्म्य की ताटस्थ्य हा महत्त्वाचा साहित्यशास्त्रीय प्रश्न उपस्थित केलेला आहे. ज्यांच्या स्मरणार्थ कुसुमावतींचा 'मराठी कादंबरी' हा ग्रंथ प्रकाशित झालेला आहे ते वामन मल्हार जोशी हे ताटस्थ्यवादी होते; आणि कुसुमावती ह्या तादात्म्यवादी आहेत. वामन मल्हारांना, न. चिं. केळकरांच्या सविकल्प समाधीच्या तत्त्वाचें खंडन करण्याच्या निमित्तानें, आपल्या ताटस्थ्यवादाचें समर्थन करण्यांत जसें यश मिळालें आहे तसें कुसुमावतींना आपल्या तादात्म्यवादाचें समर्थन करतांना मिळालेलें आहे असें वाटत नाही. शुक्रनीतिसार, योगशास्त्र, 'हृदयाकाशांतील प्रतिबिंब'—इत्यादींचे आधार देऊन तादात्म्यवाद पटवून देण्याचा त्यांनी जो प्रयत्न केलेला आहे त्यांत गाढ विद्वत्तेचा आभास उत्तम साधलेला आहे, पण वाङ्मयनिर्मितींतील किंवा वाङ्मयाच्या स्वादांतील तादात्म्याचा त्यांनी लावलेल्या अर्थाभोंवती मात्र गूढतेचें आवरण पडलेलें आहे. पुन्हा 'भारतीय कलाशास्त्र (?)' या संज्ञेचा त्यांनी वरचेवर केलेला उल्लेख चिन्त्य आहे. आणखीहि एक मुद्दा विचारणीय आहे. कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या मूल्यमापनाचीं तत्त्वें निश्चित करतांना भारतीय मूर्तिकलेंतील तत्त्वांचा आश्रय घेणें कितपत इष्ट आहे, मूर्तिकला आणि वाङ्मयकला यांचीं नियामक तत्त्वें आणि यांच्या निर्मितीचें तंत्रशास्त्र हें एकच आहे काय? भारतीयांचें साहित्यशास्त्र चांगलें समृद्ध असतांना कादंबरीच्या परीक्षणाचीं तत्त्वें निश्चित करण्यांत त्याचा उपयोग कां करण्यांत येऊं नये? भारतीय साहित्यशास्त्रांत तादात्म्य की ताटस्थ्य या प्रश्नाचा लोल्लट, शंकुक, भट्टनायक, अभिनवगुप्त इत्यादि साहित्यशास्त्रविशारदांनी अत्यंत सूक्ष्म विचार केलेला असल्यामुळें त्या शास्त्राचा उपयोग अनेक दृष्टींनी उपकारक ठरला असता. असो.

कुसुमावतींनी 'कादंबरीचा उगम' या प्रकरणांत एक विवाद्य विधान केलें आहे. त्यांनी लिहिलें आहे, "मोरोपंतांचीं महाभारताचीं पर्वें, रामायणाचे प्रकार, श्रीधराचा रामविजय, वामनपंडितांचीं आख्यानें म्हणजे एक प्रकारच्या कादंबऱ्याच." या विधानांतील विचाराशीं सकृद्दर्शनीं सदृश वाटणारा विचार अनेक पाश्चिमात्य टीकाकारांनी मांडलेला आहे. उदाहरणार्थ The world Literature आणि Study of Literature या ग्रंथांचा कर्ता मोल्टन, Novel and the People या ग्रंथांचा कर्ता, Evolution of the English Novel या ग्रंथांचा कर्ता यांनी, आज महाकाव्याची जागा कादंबरीनें घेतलेली आहे असें म्हटलें आहे. फील्डींगने आपल्या 'टॉम जोन्स' नांवाच्या कादंबरीचें Heroic historical prosaic

poem असें जें वर्णन केलें आहे तें या दृष्टीने अत्यंत सूचक आहे. प्राचीन मराठींतील आख्यानक काव्यें म्हणजे एक प्रकारच्या कादंबऱ्याच आहेत, असलें विधान करण्याची प्रेरणा कुसुमावतींना उपरोक्त वा अन्य पाश्चिमात्य साहित्यविवेचकांकडून मिळाली असेल असें म्हणून त्यांचें स्वयं-प्रज्ञत्व आपणांस हिरावून घ्यावयाचें नाही. वादाचा मुद्दा निराळा आहे. प्राचीन मराठी आख्यानक काव्यांना कादंबऱ्या म्हणणें हें सयुक्तिक आहे काय? 'मोरोपंत-वामनपंडितांचीं आख्यानक काव्यें ह्या कादंबऱ्याच आहेत' आणि 'पूर्वी आख्यानक कविता जें कार्य करीत असे तेंच कार्य आज कादंबरी करीत आहे' हीं दोन्ही विधानें सारखींच आहेत काय? पहिल्या विधानापेक्षा दुसऱ्या प्रकारच्या विधानासारखें विधान कुसुमावतींनी केलें असतें तर तें अधिक योग्य झालें नसतें काय? मोरोपंताच्या आर्याभारतांत मराठी कादंबरीचा उगम आहे असें म्हणणें आणि वेदांत आगगाडी आहे असें म्हणणें या दोन्ही म्हणण्यांमागची भूमिका एकच नाही काय? तसें पाहिलें तर वेदांत सगळेंच आहे. मराठी कादंबरीचा उगम शोधतांना कुसुमावतींना आर्याभारताकडून व्यासाच्या भारताकडे, तेथून उपनिषदांकडेहि जातां आलें असतें. त्या दृष्टीने आपला तो सनातन आणि सोयीस्कर विचार सुप्रसिद्धच आहे. तो हा की हें सारें व्यासाचें उच्छिष्ट आहे; त्यांत आधुनिक मराठींतील कादंबरीजगताचाहि सहज समावेश करणें शक्य झालें असतें! असो.

